MAHARASHTRA STATE RURAL LIVELIHOODS MISSION
उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष
जुनी जिल्हा परिषद इमारत,
जिल्हा सामान्य रूग्णालयाच्या बाजुला, वर्धा ४४२००१
दुरध्वनी :०७१५२-२४९२२९

District Mission Management Unit
Old Zilla Parishad Building,
District Civil Hospital,Wardha 442001
Phone No. : 07152-249229.

पत्र क्र./जिपव/मराग्राजीअ/आस्था/वशी-७८३/२०२५-२६ दिनांक : ०५/०८/२०२५.

प्रती,

........................................................

........................................................

........................................................

**विषय:- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत क्षेत्रीय भेटी करिता वाहन भाडेतत्वावर घेण्याकरिता सेवा पुरवठा धारकांकडून दरपत्रक उपलब्ध करून घेण्याबाबत.**

**संदर्भ:- या कार्यालयाची मंजूर टिपणी दि.**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत जिल्हा अभियान व्यवस्थापक व जिल्हा व्यवस्थापक यांना क्षेत्रीयकार्य करिता वाहनाची आवश्यकता असल्याने जिल्हास्तरावर आवश्यकतेनुसार वाहन भाडेतत्वावर घेण्यास सेवा पुरवठा धारकांकडून खुल्या बाजारातून दरपत्रक मागविण्यात येत आहे.

करीता आपण वाहन भाडेतत्वावर देण्यास दराची सीलबंद दरपत्रक या कार्यालयास दिनांक २०/०८/२५ला दुपारी ३.०० वाजेपर्यंत सादर करावेत.सदर प्राप्त सीलबंद दरपत्रक त्याच दिवशी मा. प्रकल्प संचालक तथा सह जिल्हा अभियान संचालक जि.ग्रा. वि. य. वर्धा यांचे कक्षात साय. ५ वाजता उघडण्यात येईल. तुलनात्मक सर्वात कमी दराचे दरपत्रक मंजूर करण्यात येईल. दरपत्रकामध्ये साहित्याचे दर अपूर्ण असल्यास व दरामध्ये खोडतोड असल्यास सदरची दरपत्रक दर ग्राह्य धरल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

**वाहन भाडेतत्वावर घेण्याकरिता आवश्यक वाहनांचा तपशील खालीलप्रमाणे**

**अ.आवश्यकतेप्रमाणे मागणी तत्वा नुसार (On Call Basis)**

| वाहनाचा प्रकार | वातानुकुलीत /विना वातानुकूलित | आवश्यक संख्या |
|---|---|---|
| इनोवा किंवा समकक्ष | वातानुकुलीत | आवश्यकतेनुसार वाहन |
| बोलेरो/स्क्रोपियो किवा समकक्ष | वातानुकुलीत | आवश्यकतेनुसार वाहन |
| स्विफ्ट डिझायर किवा समकक्ष | वातानुकुलीत | आवश्यकतेनुसार वाहन |
| Traveller २६ किवा समकक्ष | वातानुकूलित | आवश्यकतेनुसार वाहन |

*आवश्यक वाहनांची संख्या हि दरपत्रक धाराकाच्या दराची तुलना व मुल्यांकन करणेकरीता घेण्यात आलेली आहे .प्रत्यक्ष अमंलबजावणी वेळेस गरजेनुसार वाहनांची संख्या कमी अथवा जास्त होऊ शकते.

**आवश्यकतेप्रमाणे मागणी तत्वा नुसार (On Call Basis)**

1. प्रती दिन 150 किमी व 8 तास (Minimum running 150 KM & 8Hrs duty / Day)
2. 150 किमीच्या वर होणारा प्रवासाचा प्रती किमी प्रती दिन दर (Rate/KM over and above 150 KM/ Day)

**विशेष सूचना** – मुक्काम झाल्यास त्याकरिता कोणताही अतिरिक्त भत्ता (Halting Charges) दिला जाणार नाही.तसेच वाहन चालकाची राहण्याची /निवासाची/भोजनाची व्यवस्था या कार्यालयाकडून केली जाणार नाही.

अ) तांत्रिक लिफाफा:-

**इच्छुक दरपत्रक धारकांनी खालील तांत्रिक कागदपत्रे सादर केली जाणे आवश्यक आहे.**

**क)** एकल स्वामित्व फर्म (Proprietary Firm)/भागीदारीफर्म(Partnership Firm)/मर्यादित कंपनी (Limited Company)/कायद्याद्वारे स्थापित निर्गमित संस्था (Corporate Body Legally Constituted) असल्याचे नोंदणी प्रमाणपत्र.

**ख)** दरपत्रक धारकाने PAN कार्डची सत्यप्रत सोबत जोडावी.

**ग)** दरपत्रक धारकाने GST कार्डची सत्यप्रत सोबत जोडावी.

**घ)** प्रवासी परवाना असलेल्या आवश्यकतेनुसार भाडेतत्वावर घेण्यात येणाऱ्या एका वाहनाचे त्या फर्मच्या नावाने असलेले संपूर्ण वैध दस्ताऐवज खालील प्रमाणे सोबत जोडावे.

१) वाहनाची RC बुकची प्रत.

२) वाहनाचा अद्ययावत विमा भरल्याची प्रत.

३) Tourist Permit नोंदणी प्रमाणपत्र.

**ब) आर्थिक लिफाफा:-**

१. फॉर्म-१ नुसार आर्थिक लिफाफा.

२. या निविदा दस्तऐवजाच्या फॉर्म–१ प्रमाणे वित्तीय लखोट्यात या निविदा दस्तऐवजात नमूद केल्याप्रमाणे तपशील आणि अटी व नियमाच्या अधिन राहून दर नमूद करणे आवश्यक आहे.

३. स्वीकारलेले दर निश्चित कालावधीसाठी दरपत्रक धारकास बंधनकारक असतील आणि कोणत्याही कारणाने करार कालावधी पूर्ण होईपर्यंत त्यात बदल केला जाणार नाही.

**१) दरपत्रक उघडणे आणि मूल्यांकन प्रक्रिया-:**

दरपत्रक अधिसूचनात नमूद केलेल्या दिनांक व वेळेला नमूद पद्धती नुसार तांत्रिक व व्यवसायिक दरपत्रक उघडल्या जातील ज्यासाठी दरपत्रक धारक स्वत: किंवा त्याचा अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकतात.

**२) निवड निकष-:**

दरपत्रक जारीकर्ता सर्व बाबी एकत्रित न्युयतम दर रक्कमेच्या (एल-१ दरपत्रकधारक )निवड करेल. दरपत्रक जारीकर्ता यांनी एकापेक्षा अधिक सेवा पुरवठादार निवडीचा अधिकारी स्वतः कडे राखून ठेवला आहे.जर कराराच्या कालावधीत कोणत्याही वेळी दरपत्रक सेवासाठीची किंमत केंद्रीय किंवा राज्य सरकारच्या कोणत्याही कायद्याच्या किंवा अधिनियमाव्दारे कमी केली गेली असेल तर दरपत्रक धारकाला नैतिक आणि वैधानिकदृष्ट्या करार केलेल्या किमती कमी होण्याबाबतची माहिती ताबडतोब दरपत्रक जारीकर्ता / खरेदीदाराला सांगणे बंधनकारक असेल. त्यानुसार दर कमी करण्याचा अधिकार असेल.

**३) दरपत्रक स्वीकारण्याचा किवा सर्व दरपत्रक नाकारण्याचा अधिकार-:**

कोणतीही दरपत्रक स्वीकारण्याचे किंवा नाकारण्याचे अधिकार आणि करार करण्याआधी दरपत्रक प्रक्रिया रद्द करण्याच्या आणि कोणत्याही वेळी कोणतीही दरपत्रक किंवा सर्व दरपत्रक रद्द करण्याचे अधिकार कोणत्याही दायित्वाविना दरपत्रक जारीकर्ता कडे राखून ठेवला आहे.

**४) दंड -:**

कामकाजाच्या व्याप्ती मध्ये नमूद केलेल्या अटीव शर्ती पूर्ण करण्यासाठी (Scope of Work )दरपत्रक धारक अयशस्वी ठरल्यास प्रती प्रसंग प्रती दिवस रुपये ५००/-दंड आकारण्यात येईल.

**५) देयक अदा करण्याबाबत अटी: -**

निर्धारित केलेल्या अधिकारी यांनी योग्यरित्या प्रमाणित करून स्वाक्षरी केलेल्या logbook प्रतिसह देयक (Tax Invoice) सेवा पुरवठादाराने सादर केल्याच्या दिनांकापासून दोन आठवड्यांत देय रक्कम सर्व कर वजावटीसह निधी उपलब्धते नुसार देयक दरमहा अदा करण्यात येतील.

**इतर अटी व शर्ती :- निवड करण्यात आलेल्या पुरवठाधारकास**

१. सदर वाहनाचे मॉडेल २०२१ नंतरचे असावे.

२. या कार्यालय मार्फत कोणत्याही स्तरावर पुर्वसुचना न देता दर करार रद्द करण्याचा किवा कार्यारंभ आदेश रद्द करण्याचा अधिकार दरपत्रक जरीकर्ता यांनी राखुन ठेवण्यात आलेला आहे.

३. शासकीय सेवेबाबत कोणत्याही स्वरुपाची तक्रार या कार्यालयाकडे येणार नाही,तसे झाल्यास हे कार्यालय कोणत्याही स्तरावर सेवा रद्द करण्याचा अधिकार राखुन ठेवत आहे.

४. तसे उद्भवल्यास अटी व शर्तीनुसार दंडात्मक रक्कम वसुल करून आपणाला शासनाच्या काळ्या यादीत समाविष्ट करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

५. देयक सादर करतांना शासकीय कर स्वतंत्र दर्शवावे.

६. महिन्यातील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी संपुर्ण वेळ वाहन उपलब्ध असणे आवश्यक आहे. शनिवार,रविवारी व राजपत्रित सुट्टीच्या दिवशी देखील वाहने क्षेत्रभेटी करिता उपलब्ध करून द्यावी लागतील.

७. जरी या कराराचा कालावधी ११ महिन्याचा असला तरी कार्यालयाच्या आवश्यकतेप्रमाणे आपली सेवा व दिलेल्या अटी शर्तींच्या अधीन राहून द्विपक्षीत सामजस्ताने कमी अथवा जास्त करता येईल.

८. सेवापुरवठा करण्यात येणारी प्रवासी वाहतूक परवाना नंतर परिवहन खात्याकडे नोंदणीकृत असलेली चालू व तांत्रिक दृष्ट्या उत्तम स्थितीत असलेले वाहने पुरविणे बंधनकारक आहे. त्याबाबत RTO यांचे प्रमाणित असले पाहिजे.करार कालावधीत वाहनांची अंतर्गत व बाह्य स्वच्छता ठेवणे, पुरविण्यात आलेले वाहन अचानक बंद पडल्यास, त्वरित समकक्ष वाहन उपलब्ध करून देण्याची जबाबदारी सेवा पुरवठा धारकाची राहील.

९. कार्यालयाकडून मागणी केले नंतर दरपत्रक धारकाने नियोजित ठिकाणी वेळेवर वाहन उपलब्ध न करून दिल्यास, कार्यालय खुल्या बाजारातून इतर सेवा पुरवठादाराकडून वाहन उपलब्ध करून घेईल व त्याकरिता येणारा खर्च सेवापुरवठा धारकाकडून वसूल करण्यात येईल.

१०. वाहने तांत्रिक दृष्ट्या व उत्तम स्थितीत चालण्याकरिता येणारा सर्व खर्च ( जसे कि इंधन (Disel/ Petrol), वाहन दुरूस्ती, व त्याकरिता आवश्यक सुट्टे भाग,/Spare parts, वाहन चालकाचा पगार, व इतर आवश्यक खर्च ) हे सेवा पुरवठा धारकाला स्वत: करणे बंधनकारक राहील.

११. व्यावसायिक वाहने चालविण्याकरिता आवश्यक परवाने, वाहनचालकाचा परवाना, लागू असलेल्या करांचा भरणा केलेल्या पावत्या, उतरविण्यात आलेल्या विम्याची कागदपत्रे, वाहनामध्ये उपलब्ध असली पाहिजेत.

१२. अपवादात्मक परिस्थितीमध्ये वाहनामध्ये अथवा वाहनचालक बदलावयाचा असल्यास, त्याकरिता मा.प्रकल्प संचालक जि.ग्रा.वि.य.वर्धा यांची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.

१३. वाहनचालकास वर्धा जिल्ह्यातील गावाची, रस्त्याची इत्यंभूत माहिती असणे आवश्यक आहे. त्याचाकडे वाहन चालाविण्याचा वैध परवाना असणे आवश्यक आहे. वाहनचालकास विहित केलेली वर्दी (Uniform) परिधान करणे, स्थानिक भाषेवर प्रभुत्व असणे, वाहनचालक सभ्य शालीन व चांगल्या वर्तणुकीचा असावा, वाहनचालक निर्व्यसनी असावा तसेच त्याचाकडे मोबाईल फोन असणे बंधनकारक राहील. वाहनचालकाने गैरवर्तणूक केल्यास त्याचे विरुद्ध व सेवापुरवठा धारका विरुद्ध कायदेशीर व दंडात्मक कारवाई करण्याचा अधिकार दरपत्रक जरीकर्ता यांना राहील.

१४. वाहनाची एकूण धाव (mileage) निश्चित करताना व देयक (Bill) बनविताना, कार्यालयीन निर्देशानुसार सुचविलेल्या ठिकाण व वेळच ग्राह्य धरली जाईल. कोणत्याही परिस्थितीमध्ये कार्यालयीन निर्देश व्यतिरिक्तच्या धावेचे देयक अदा केले जाणार नाही.

१५. अपघाताने होणा-या वाहनाच्या नुकसानीस तसेच अपघातामुळे होणा-या इतर वाहनाच्या नुकसानीस हे कार्यालय जबाबदार राहणार नाहीत.वाहनाचा comprehensive insurance उतरविणे बंधनकारक आहे.

१६. निवड झालेल्या सेवापुरवठादाराने करारातील अटी व शर्तीच्या अधीन राहून करार कालावधीत वाहनांची जसे व ज्यावेळी मागणी करतील त्यावेळी पुरवठा करावयाचा आहे. तसेच वातानुकुलीत(AC) सुविधा देणे बंधनकारक राहील.मागणी नुसार वेळेच्या आत वाहने उपलब्ध न करुन देणे, करार कालावधीच्या वेळेपूर्वी वाहनाचा पुरवठा व इतर सेवा बंद करणे, करारातील कोणत्याही अटी व शर्तीचा भंग करणे याबाबत होणारी नुकसान भरपाई संबधित पुरवठाधारकाकडून वसुल करण्यात येईल.व सदरची सेवा रद्द करण्यात येईल.

१७. पुरविण्यात आलेले वाहन चालक हे निवड केलेल्या सेवापुरवठा धारकाचे कर्मचारी असतील व त्याची सर्वस्वी जबाबदारी सेवापुरवठा धारकाची राहील.

१८. निवडण्यात आलेल्या सेवापुरवठा धारकास वैधानिक बाबीची पूर्तता करावी लागेल.

१९. शासकीय सर्व नियमांचे /कायद्याचे पालन करणे बंधनकारक आहे .

२०. पुरवठादाराच्या देयकातुन नियमानुसार विहित कर कपात करण्यात येईल.

२१. स्थानिक प्रशासन यांनी दिलेल्या सूचनाचे पालन करावे लागेल.

२२. कोणत्याही कारणास्तव कोणत्याही परिस्थीतीत आगाऊ पैसे दिले जाणार नाहीत.

२३. निवड करण्यात आलेल्या सेवापुरवठा धारकाने सादर केलेले दर हे ११ महिन्याच्या करार कालावधीकरीता आहेत. इंधन व सुट्टे भाग यांच्या किंमती वाढ झाली तरी किंवा कोणत्याही परिस्थितीमध्ये निश्चित केलेल्या दरामध्ये वाढ होणार नाही.

२४. प्रत्येक वाहनासाठी स्वतंत्र logbook ठेवून ते त्यावर वेळोवेळी झालेल्या धावांची नोंद घेण्याची व अद्यावत ठेवण्याची जबाबदारी सेवा पुरवठा धारकाकडील डाव्हरची त्यावर सक्षम अधिकारी यांची स्वाक्षरी घेऊन देयका सोबत सादर करावी.

२५. संबधीत कामाकरिता उप कंत्राटदार (Sub Contractor) नेमता येणार नाही.

२६. या कार्यालयाकडून नामनिर्देशित केलेल्या अधिका-याकडून सेवापुरवठा धारकास वाहन पुरविण्याबाबत सूचना देण्यात येतील व त्यानुसार वेळेवर वाहन पुरवण्याची जबाबदारी पुरवठा धारकाची राहील.

२७. तातडीच्या व अपवादात्मक परिस्थितीमध्ये कमी कालावधीच्या सूचनेवर देखील सेवापुरवठा धारकास वाहने पुरवावी लागतील.

२८. यशस्वी सेवापुरवठा धारकास व्यावसायिक वाहने वापरणे / चालविणे बाबत केंद्र व राज्य शासनाच्या वाहतुक परिवहन विभागाचे सर्व कायदे व नियमाचे पालन करणे आवश्यक आहे.

२९. सेवापुरवठा धाराकाच्या निष्काळजीपणामुळे केंद्र व राज्य सरकारच्या कायद्याचा / नियमाचा भंग झाल्यामुळे होणा-या नुकसानीस सेवापुरवठा धारक जबाबदार असेल.

३०. आदेश दिल्यानंतर वाहन उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील.

३१. सेवापुरवठादाराने रु.१००/- च्या बॉंडपेपर वर सर्व अटी व शर्ती मान्य असल्यासबाबत करारनामा तातडीने प्रमाणित करून कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.

३२. वरील सर्व अटी व शर्ती पैकी कोणतीही अट अथवा निर्णय बदल करण्याचे अधिकार दरपत्रक जरीकर्ता यांनी राखुन ठेवण्यात आले आहेत.

**(वैशाली रसाळ)**
**जिल्हा अभियान सह-संचालक, एमएसआरएलएम**
**तथा प्रकल्प संचालक,जि.ग्रा.वि.य वर्धा.**

**प्रतिलिपी:-**

१) जिल्हा अभियान संचालक एमएसआरएल तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.वर्धा यांना माहितीस सविनय सादर.
२) जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष,वर्धा सूचना फलक.
३) माहिती व तंत्रज्ञान कक्ष,जिल्हा परिषद वर्धा यांना प्रसिद्धीकरिता सादर.

**(वैशाली रसाळ)**
**जिल्हा अभियान सह-संचालक, एमएसआरएलएम**
**तथा प्रकल्प संचालक,जि.ग्रा.वि.य वर्धा.**

फॉर्म-१( Financial bid format Form-1)

व्यावसायिक (आर्थिक)दरपत्रक चे प्रपत्र(सेवापुरवठा धारकाच्या पत्र शीर्षक सह)

दिनांक:

प्रति,

मा. जिल्हा अभियान सह-संचालक,
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवोनान्नती अभियान तथा
प्रकल्प संचालक,जि.ग्रा.वि.य वर्धा.

**विषय:-** जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष वर्धा करिता आवश्यकतेनुसार वेळोवेळी लागणारे वाहन भाडेतत्वावर पुरविण्यासाठी दर सादर करणे बाबत.

**संदर्भ :-** आपले दरपत्रकएमएसआरएलएम/डीएमएमयु/वाहन/वर्धा / /२०२५ ,दि.

मा. महोदय,

आपल्या आवश्यकतेनुसार, आम्हाला आमचे सर्वात वाजवी आणि स्पर्धात्मक दर सादर करण्यास आनंद होत आहे.

| आवश्यकतेप्रमाणे मागणी तत्वा नुसार (On Call Basis) | | | | |
|---|---|---|---|---|
| वाहनाचा प्रकार | अटी | एकक | प्रती महिना नग | मासिक दर |
| इनोवा किंवा समकक्ष (वातानुकुलीत) | कमीत कमी १५० कि.मी. | एका दिवसाकरिता | १ वाहन | |
| | १५० कि.मी.च्या वर प्रती कि.मी.दर | कि.मी. | १ कि.मी. | |
| बोलेरो/स्क्रोपियो किवा समकक्ष (वातानुकुलीत) | कमीत कमी १५० कि.मी. | एका दिवसाकरिता | १ वाहन | |
| | १५० कि.मी.च्या वर प्रती कि.मी.दर | कि.मी. | १ कि.मी. | |
| स्विफ्ट डिझायर किवा समकक्ष (वातानुकुलीत) | कमीत कमी १५० कि.मी. | एका दिवसाकरिता | १ वाहन | |
| | १५० कि.मी.च्या वर प्रती कि.मी.दर | कि.मी. | १ कि.मी. | |
| Traveller २६ सीटर किवा समकक्ष (वातानुकुलीत) | कमीत कमी १५० कि.मी. | एका दिवसाकरिता | १ वाहन | |
| | १५० कि.मी.च्या वर प्रती कि.मी.दर | कि.मी. | १ कि.मी. | |
| | | | **एकूण रुपये** | |

*** टीप – उपरोक्त आवश्यक वाहनांची नमूद संख्या (Quantity Per Month) हि दरपत्रक मुल्यांकनाकरिता घेण्यात आलेली असून वास्तविकता करार अंमलबजावणी वेळेस वाहन संख्या कमी अथवा जास्त लागू शकते. आर्थिक मुल्यांकन करतानी आवश्यकतेप्रमाणे मागणी तत्वा नुसार (on Call Basis) दरपत्रकधारक सर्वात कमी दर सादर करेल तो L १ ठरेल.**

आम्ही दरपत्रक दस्तऐवजामध्ये नमूद केलेल्या अटी व नियमांनुसार उपरोक्त दरामध्ये सेवा प्रदान करण्यास तयार आहे.आम्ही याव्दारे प्रमाणित करतो की,आम्ही आमच्यासाठी कार्य करणाऱ्या किंवा आमच्या वतीने कार्य करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने लाचलुचपत किंवा प्रतिस्पर्ध्यांशी संगनमत करून संभ्रम करार करणार नाही. याची खात्री करीत आहोत.

निविदाधारकाची स्वाक्षरी

नाव: ____________________ कार्यालयीन हुद्दा/शिक्का